# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-२६ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ३० जानेवारी २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# नवी मुंबईतून मुंब्रा, दिवा,कल्याण-डोंबिवलीच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांच्या वेळेची बचत करणारा प्रकल्प प्रगतीपथावर

## ऐरोली-काटई नाका रस्ता प्रकल्पातील पारसिक डोंगरातील डावा बोगदा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत खुला

**पारसिक बोगद्यामुळे लोकांच्या प्रवासातील वेळेत बचत होईल - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**



**दिवा(प्रतिनिधी):** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ऐरोली कटाई नाका रस्ता प्रकल्पांतर्गत पारसिक डोंगरामधील मुंब्रा ते ऐरोली बोगद्याच्या डाव्या बाजूच्या मार्गाचे काम पूर्ण करण्यात आले असून नियंत्रित स्फोट पद्धतीचा वापर करून हा बोगदा दोन्ही बाजूने खुला करण्याचा कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला. या प्रकल्पातील डाव्या बाजूच्या बोगद्याच्या भुयारीकरणाचे काम आता पूर्ण झाले असून हा बोगदा दोन्ही बाजूने खुला झाला आहे. या प्रकल्पामुळे कल्याण, डोंबिवली, मुंब्रा, नवी मुंबई व ठाणे परिसरातील नागरिकांच्या प्रवासाच्या वेळेत बचत होईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास यांच्यासह अधिकारी, अभियंते उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, कल्याण डोंबिवली आणि नवी मुंबईतील अंतर कमी करणाऱ्या ऐरोली ते कटाई भुयारी मार्गातील डाव्या बाजूकडील बोगदा दोन्ही बाजूकडून जोडण्यात आला आहे. या ऐरोली काटई प्रकल्पामुळे कल्याण,डोंबिवली, मुंब्रा, ऐरोली, नवी मुंबई, ठाणे, मुंबई परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. या रस्त्यामुळे सात किमी अंतर कमी होणार असून नवी मुंबई येथून डोंबिवली, कल्याण,अंबरनाथ, बदलापूर येथे जाणाऱ्या प्रवाशांच्या वेळेत कमालीची बचत होणार असून इंधनाचीही बचत होणार आहे. प्रवासाचा वेळ वाचल्यामुळे नागरिकांच्या कार्यक्षमतेतही वाढ होईल.

राज्य शासनाच्या वतीने अनेक पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. शिळफाटा ते कल्याण व कल्याण ते भिवंडी असा थेट एलिव्हेटेड उड्डाणपूल करणार आहोत. तसेच कल्याण ते तळोजा मेट्रो असा दुमजली रस्ता व मेट्रो असलेला मार्गाचे नियोजन आहे. याशिवाय मानकोली -डोंबिवली या खाडी पुलाच्या कामामुळे अंतर कमी होईल. ठाण्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी चेंबूर फ्रिवे जेथे उतरतो त्या ठिकाणाहून थेट फाऊंटनपर्यंत शहराच्या बाहेरुन बायपास करतोय. ज्या ज्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते अशा ठिकाणी असे अनेक प्रकल्प राबवित आहोत. मुंबई व मुंबई महानगर परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून क्रॉसिंग असलेल्या ठिकाणी डबलडेकर टनेल ही संकल्पना राबविणार आहोत. जेणेकरून मुंबई आणि एमएमआरमधल्या लाखो प्रवाशांची वाहतूक कोंडीमधून सुटका होईल व त्यांचे जीवन सुसह्य होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

ऐरोली कटाई नाका प्रकल्प हा तीन भागात विभागाला गेला असून भाग-१ अंतर्गत चा रस्ता हा ठाणे बेलापूर रोड ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ आहे. सदर भागाची लांबी ३.४ कि.मी. इतकी असून त्यामध्ये १.६९ कि.मी. लांबीचा दुहेरी बोगदा व उर्वरित रस्ता व उन्नत मार्ग आहे. सदर प्रकल्पात असलेला बोगदा हा चार ४+४ मार्गिकेचा आहे.( त्यामध्ये १+१ रेफ्युजी मार्गिका आहे.) **(पान २ वर)**




दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ३० जानेवारी २०२३


# दिवा जंक्शन व ठाणे स्टेशन वरील विविध समस्या बाबत आ.संजय केळकर यांनी घेतली मुंबई मंडल रेल प्रबंधक यांची भेट

**ठाणे:**-ठाणे जंक्शन स्टेशन वर बूट पॉलिश करून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांच्या विविध मागण्या व दिवा जंक्शन स्टेशन प्लॅटफॉर्म क्रमांक१,२,३ व ४ या स्टेशनची उंची तात्काळ वाढवण्यात यावी जेणेकरून प्रवाशांना उतरण्यास त्रास होणार नाही व अपघाताचे प्रमाण कमी प्रमाणात होईल यासह विविध मागण्यांसाठी भाजपचे ज्येष्ठ आमदार संजय केळकर यांनी रेल्वे अधिकाऱ्यांची मुंबई येथे भेट घेतली.

दिवा स्टेशन वरील सर्व फलाट वर पाण्याची सुविधा तात्काळ करण्यात यावी जेणेकरून प्रवासाची गैरसोय होणार नाही. तसेच कोकण रेल्वे मार्गावर आगासन थांब्यावरती कोकणात जाणाऱ्या पॅसेंजर गाडीचा थांबा लवकरात लवकर देण्यात यावा जेणेकरून कोकणात जाणाऱ्या लोकांचे हाल होणार नाहीत व नोकरदार वर्ग व शाळकरी मुलांना जाण्या येण्याची गैरसोय होणार नाही अशी मागणी यावेळी करण्यात आली. दिवा स्टेशनवरील आर ओ बी ब्रिज चे काम संथ गतीने चालू आहे, या संदर्भात तात्काळ ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांशी चर्चा करून बाधितांना योग्य तो मोबदला देऊन लवकरात लवकर आर ओ बी ब्रिज सुरू करावा या संदर्भात आमदार संजय केळकर यांनी मंडल रेल प्रबंधक रजनीश कुमार गोयल (DRM) यांची मुंबई येथील कार्यालयात भेट घेतली. त्यांच्याबरोबर साउथ सेल उपाध्यक्ष रविराज रेड्डी, दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे, महिला मोर्चा अध्यक्ष ज्योती पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# ठाण्यात एकाच दिवशी ४५१ किलो प्लॅस्टिक जप्त

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या माध्यमातून संपूर्ण महापालिका कार्यक्षेत्रात नियमित प्लॅस्टिक बंदी कारवाई सुरू असून सोमवारी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत वागळे इस्टेट, उथळसर, कळवा व दिवा प्रभागसमिती कार्यक्षेत्रात कारवाई करण्यात आली. या तिन्ही विभागाअतर्गत करण्यात आलेल्या कारवाईत एकूण ४५१ किलो प्लॅस्टिक जप्त केला असून यापोटी ११ हजार-५०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला. वागळे प्रभाग समिती अंतर्गत प्लास्टिक बंदी अभियान राबविण्यात आले. या विभागात एकूण २३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून एकूण ३ किलो प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून त्यांचकडून ५ हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. उथळसर प्रभाग समिती अंतर्गत गोकुळ दास वाडी खोपट येथील एका प्लास्टिक गोडावून मध्ये ४५० किलो प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून ५००० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## नवी मुंबईतून मुंब्रा, दिवा,कल्याण-डोंबिवलीच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांच्या वेळेची बचत करणारा प्रकल्प प्रगतीपथावर (पान १ वरून)

सदर बोगद्यांचे भुयारीकरणाचे काम हे New Austrian Tunneling Method (NATM) कंट्रोलिंग ब्लास्टिंग या तंत्रज्ञान पद्धतीने करण्यात येत आहे. सद्यस्थितीत बोगद्याचे ६७ टक्के काम पूर्ण झाले असून प्रकल्पाची उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. सद्य:स्थितीत प्रवाशांना महापे किंवा ठाणे येथून मार्ग काढून जावे लागत आहे. या प्रकल्पामुळे कल्याण- डोंबिवली आणि नवी मुंबई मधील अंतर ७ कि.मी. ने कमी होईल. त्यामुळे वेळेची आणि इंधनाची बचत होईल. सदर प्रकल्पामुळे कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल. एमएमआरडीचे महानगर आयुक्त श्रीनिवास म्हणाले की, पारसिक टेकड्यामधील भुयारीकरणाचे काम हे खूप अवघड आहे. आज डाव्या बाजूच्या बोगद्यात शेवटचा ब्लास्ट करून तो दोन्ही बाजूंनी खुला झाला आहे. ह्या बोगद्याच्या दुसऱ्या बाजूच्या भुयारीकरणाचे काम देखील लवकरच पूर्ण होईल. दोन्ही बाजूंचे काम पूर्ण झाल्यावर प्रकल्पातील महत्त्वाचा आणि अवघड टप्पा पार होईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर शिळफाटा रस्त्यावरील अवजड वाहतूक कमी होईल आणि कटाई नाका ते ऐरोली दरम्यानच्या प्रवासात ३० मिनिटांनी कमी होईल. ज्याचा फायदा मुंबईहून कल्याण, अंबरनाथ आणि बदलापूरकडे जाणाऱ्या प्रवाशांना होईल.

# पद्मश्री दया पवार प्रतिष्ठानच्या 'चावडी'वर रंगणार अघोषित आणीबाणीची चर्चा

**ठाणे :** पद्मश्री दया पवार प्रतिष्ठानच्या वतीने 'चावडी' हा एक नवा सार्वजनिक मंच सुरू करण्यात येणार आहे. चावडीच्या पहिल्याच कार्यक्रमात भारतीय लोकशाहीच्या अस्तित्वाबाबत म्हणजेच 'अघोषित आणीबाणी'बाबत विचारवंतांची व्याख्याने होणार आहेत, अशी माहिती प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा तथा ज्येष्ठ कवयित्री व लेखिका प्रा. डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी दिली.

पद्मश्री दया पवार प्रतिष्ठान आयोजित 'चावडी'चे उद्घाटन शनिवार, २८ जानेवारी रोजी सायं. ५ ते ९ या वेळेत दादर माटुंगा कल्चरल सेंटर, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा पश्चिम येथे लोकशाहीर कडुबाई खरात यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. चावडीमध्ये दोन व्याख्याने, कवी-संमेलन तसेच शाहिरी गायन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

ज्येष्ठ पत्रकार व लेखक प्रा. सुरेश द्वादशीवार आणि युवा अभ्यासक, लेखक डॉ. सूरज एंगडे यांची अनुक्रमे 'अघोषित आणीबाणीच्या विळख्यात भारतीय लोकशाही' आणि 'समतावादी समाजाचा युटोपिया' या विषयांवर व्याख्याने होणार आहेत. ज्येष्ठ कवी, लेखक अर्जुन डांगळे यांच्या अध्यक्ष असलेल्या 'पाणी कुठंवर आलं गं बाई' हा दया पवारांच्या कवितांचा तसेच निमंत्रित कवींच्या कवितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यात ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, नीरजा, अविनाश गायकवाड, गणेश कनाटे, छाया कोरेगावकर, दिशा पिंकी शेख, अक्षय शिंपी हे कवी-कवयित्री सहभागी होतील. लोकशाहीच्या समर्थकांसह समतावादी विचारधारेच्या नागरिकांनी या वैचारिक सांस्कृतिक जागरात सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**


Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटनेकडून दिवा रेल्वे स्थानकातील विविध कामांमध्ये असणाऱ्या तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा





**दिवा:–** संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटनेच्या माध्यमातून दिवा रेल्वे स्थानकात ५ व ६ फलाटावर शौचालयाचे काम रेल्वे प्रशासनाने सुरू केले होते. त्या कामाचा आढावा घेण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष विजय भोईर, सचिन भोईर,रेल्वेचे वरीष्ठ अधिकारी पैठणकर व त्यांचे इतर सहकारी यांनी दिवा स्थानकात पाहणी दौरा केला. यावेळी विजय भोईर व सचिन भोईर यांनी स्थानकात प्राधान्याने जी गरजेची कामे आहेत ती अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली.दिवा पूर्व व पश्चिमेला एक्सेलटर बसवण्यात काही तांत्रिक त्रुटी होत्या. म्हणून स्वतः पैठणकर , त्यांचे सहकारी व्ही.के.शर्मा व इतर अधिकाऱ्यांनी त्यावर तोडगा निघावा म्हणून चर्चा केली. तर पैठणकर साहेबांनी तातडीने त्या तांत्रिक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचं आश्वासन विजय भोईर यांना दिले. त्याचबरोबर त्यांनी पाणपोई, शौचालयाच्या कामांना गती देण्याचे आदेश यावेळी दिले.





## हळदी कुंकू समारंभांना सौ अर्चना निलेश पाटील यांची उपस्थिती

दिवा:– सामाजिक कार्यकर्त्या सौ अर्चना निलेश पाटील यांनी दिवा विभागातील विविध ठिकाणी आयोजित हळदी कुंकू कार्यक्रमाला उपस्थिती लावली. शहरातील अनेक महिला मंडळांनी हळदीकुंकू समारंभ आयोजित केले असून या समारंभांना सौ.अर्चना निलेश पाटील या आवर्जून उपस्थित राहत आहेत.



## हळदी कुंकू समारंभांना सौ. ज्योती पाटील यांची उपस्थिती

**दिवा:–** दिवा शहरात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या हळदीकुंकू समारंभांना तन्वी फाउंडेशनच्या अध्यक्षा व भारतीय जनता पार्टी महिला मंडळ अध्यक्षा सौ.ज्योती पाटील यांनी उपस्थिती लावली त्यावेळेचे छायाचित्र.यावेळी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.





## आदेश भगत यांची बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या उपशहर प्रमुख पदी नियुक्ती

**दिवा:–**मागील वर्षभरापूर्वी भारतीय जनता पार्टी मधून शिवसेनेत दाखल झालेले ॲड.आदेश भगत यांची बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या उपशहर प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

याबाबतचे नियुक्तीपत्र कल्याण लोकसभेचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी आदेश भगत यांना दिले असून यावेळी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी उपस्थित होते.

आदेश भगत हे दिवा रेल्वे प्रवासी संघटनेच्या माध्यमातून मागील अनेक वर्ष समाजकारणात सक्रिय असून शिवसेनेत प्रवेश करण्याआधी ते भारतीय जनता पार्टी दिवा शहर मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत होते. आता बाळासाहेबांची शिवसेना पक्षाने त्यांच्यावर दिवा उप शहर प्रमुख पदाची जबाबदारी सोपवली आहे.

## सर्वदचा कवी/ लेखक पुरस्कार अविनाश लोंढे यांना

**मुंबई:–** येथील सर्वद फौंडेशन मार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय कवी लेखक पुरस्कार २०२३ तरुण कवी अविनाश लोंढे यांना देण्यात आला आहे. दिनांक २१ जानेवारीला दादर येथे एका दिमाखदार सोहळ्यात प्रसिद्ध साहित्यिक प्रा.अशोक बागवे आणि पर्यटन संचालनालय उपसंचालक हनुमंत गाडे यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. यावेळी सर्वद तेज ह्या पुस्तकाचे प्रकाशन सुद्धा करण्यात आले. पेशाने योग शिक्षक असणारे लोंढे गेल्या दोन दशकापासून वास्तवदर्शी लिखाण सातत्याने करत आहेत.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ३० जानेवारी २०२३


## मुख्यमंत्री ठाण्याचाच असल्याने शहराचाही विकास वेगाने होईल –मुख्यमंत्री शिंदे

**ठाणे :** मुख्यमंत्री झाल्यानंतर गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून मी विविध कार्यक्रमांना जातो. राज्यात नाहीतर देशभरातही कार्यक्रमांना हजेरी लावतो. पण, ठाण्याच्या कार्यक्रमात एक विशेष बाब जाणवते. ठाण्यातील कार्यक्रमात आगळेवेगळे प्रेम,आदर आणि विश्वास दिसून येतो. त्यातच हे शहर सुरक्षित असल्याने येथे मोठ्या संख्येने व्यापारी वर्ग येऊन वसला आहे. याशिवाय आता ठाण्याचे एकनाथ शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री असल्याने ठाणे शहराचा विकास हा आणखीन वेगाने होईल, यांच्यामध्ये शंकाच नाही. असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी ठाण्यात एका कार्यक्रमात बोलताना केले.

शहरातील टेंभीनाका येथे असलेल्या जैन मंदिरात आयोजित धार्मिक महोत्सवाला मुख्यमंत्री शिंदे यांनी रविवारी भेट दिली. यावेळी जैन बांधवांनी मुख्यमंत्री शिंदे यांचा पगडी आणि मानपत्र देऊन सन्मान केला. तसेच जैन बांधवांनी समाजाला शाळा उभारायची आहे अशी मागणी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात आपण महापालिका आयुक्तांशी चर्चा करून आरक्षित भूखंड देण्याबाबत सूचना करू असे आश्वासन दिले. दिवंगत आनंद दिघे यांचे जैन समाजावर विशेष प्रेम होते. अशीही आठवण करू दिली. तसेच धर्मवीर चित्रपट पाहिला का? असे विचारले. तसेच दुसरा ही धर्मवीर चित्रपट लवकरच येत असल्याचे सांगितले. जैन समाज हा ठाणे शहराच्या विकासात नेहमी पुढे होता. कोरोना काळातही या समाजाने मोठे योगदान दिल्याचे सांगितले.

## भाजप नेते शिवाजी आव्हाड यांच्याकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन





**डोंबिवली:–** वाढत्या शैक्षणिक स्पर्धेतून वार्षिक परीक्षेच्या वेळी मुलांमध्ये सातत्याने तणाव वाढत असतो. या तणावातून दिलासा देण्यासाठी पंतप्रधान श् नरेंद्र मोदी यांच्याकडून ऋपरीक्षा पे चर्चा' कार्यक्रम घेतला गेला. त्याचबरोबर मुलांचे मन हलके करण्यासाठी EXAM WARRIORS कार्यक्रम भरविला गेला.

डोंबिवली येथे स.वा.जोशी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आयोजित परीक्षे पे चर्चा उपक्रमाअंतर्गत चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवाजी आव्हाड, भाजपा सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश भटकी विमुक्त आघाडी यांनी केले. यावेळेस शिक्षणाधिकारी महाले स वा जोशी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ ज्योतीताई लोहार, सर्व शिक्षक वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते, यावेळी शिवाजी आव्हाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनच्या अध्यक्षपदी सीताराम राणे



### तिसऱ्यांदा बिनविरोध निवड

**ठाणे :** ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनच्या अध्यक्षपदी मंगळवारी सीताराम राणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सलग तिसऱ्यादा सीताराम राणे यांनी फेडरेशनचा हा गड राखल्याने मंगळवारी आमदार संजय केळकर यांनी राणे व त्यांच्या सहकार्याचे अभिनंदन केले.

ठाणे हौसिंग फेडरेशनची पंचवार्षिक निवडणूक ८ जानेवारी रोजी पार पडली. यामध्ये विरोधी पॅनलचा धुव्वा उडवत सीताराम राणे यांच्या नेतृत्वाखाली समर्थ सहकार पॅनलचे सर्वच्या सर्व २१ संचालक भरघोस मताधिक्याने निवडून आले.सलग तिसऱ्यादा सीताराम राणे यांच्या पॅनेलने फेडरेशनवर वर्चस्व राखले.आज निवडून आलेल्या संचालकांमधून सीताराम राणे यांची सलग तिसऱ्यांदा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली. त्यांच्यासह निंबा पाटील यांची उपाध्यक्षपदी तर ज्ञानू चोरगे यांची मानद सचिवपदी , डॉ. राजाराम दळवी यांची सहसचिवपदी आणि कोषाध्यक्ष म्हणून हिंदुराव गळवे याची बिनविरोध निवड झाली.

ठाणे स्टेशन नजीकच्या हौसिंग फेडरेशनच्या कार्यालयात आमदार केळकर आणि परिवहन सदस्य विकास पाटील यांच्या उपस्थितीत पदभार स्विकारुन सीताराम राणे यांनी कारभार हाती घेतला. यावेळी बोलताना सीताराम राणे यांनी, आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे हे सर्व शक्य झाले आहे. गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांनी या सगळ्या प्रक्रियेत मनापासून सहकार्य केले. त्याबद्दल सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सभासद पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.



**हॅप्पी मेडिकेअर ठाणे सेंटर मध्ये ७४ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी उपस्थित असलेले हॅप्पी मेडिकेअर ठाणे सेंटरचे प्रमुख प्रतिक चव्हाण सर, सुनील परब सर, एएसआय अशोक पवार, एएसआय रघुनाथ सुतार, एपीआय संजय पाटील , सीमा फडके मॅडम, सुनील पवार, अवधुत सुतार, विनायक सर, सुचिता मॅडम, स्नेहल मॅडम, ज्योती मॅडम, मयुरी मॅडम, प्रेक्षा मॅडम, उपस्थित होते.**

## ठाण्यात उड्डाणपुलावरून खाली पडून दोघांचा मृत्यू; दुचाकीवरील चालकाचा ताबा सुटल्याने झाला अपघात

**ठाणे:** माजिवडाकडून ठाणे स्टेशनकडे जात असताना कॅसलमिल उड्डापुलावरती दुचाकी चालकाचा दुचाकीवरील ताबा सुटला आणि ती दुचाकी उड्डाणपुलावरील संरक्षण कटड्याला धडकली. या दुर्दैवी अपघाताच्या घटनेत दोघेही उड्डाणपुलावरून खाली फेकले गेले. यामध्ये दुचाकीस्वार प्रतिक विनोद मोरे (२१) याचा जागी तर दुचाकीवर मागे बसलेला राजेश बेचेनप्रसाद गुप्ता (२६) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी उघडकीस आली. पण ही सोमवारी पहाटे घडल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

लोकमान्य नगर येथील रहिवाशी असलेला मृतक प्रतीक हा सोमवारी पहाटे ३-३० वाजण्याच्या सुमारास उल्हासनगर येथील मृतक राजेश याला घेऊन दुचाकीवरून माजिवड्याकडून ठाणे स्टेशनकडे निघाला होता. कॅसलमिल उड्डाण पुलावरती येताच दुचाकी चालक प्रतिक याचा दुचाकी वरील ताबा सुटला आणि दुचाकी उड्डाणपुलाच्या कठड्याला जाऊन जोरात धडकली. यामध्ये दुचाकीवरील प्रतीक आणि राजेश हे दोघे उड्डाणपुलाच्या खाली फेकले गेले तर दुचाकी उड्डाणपुलावर राहिली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी राबोडी पोलिसांनी धाव घेत त्या दोघांना उपचारासाठी ठाण्याच्या शासकीय रुग्णालयात नेले. त्यावेळी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अशी माहिती राबोडी पोलिसांनी दिली.

# दिव्यात बाळासाहेबांची शिवसेना मजबूत



## बाळासाहेबांची शिवसेना, पक्षाचा विचार लोकांपर्यंत पोहोचवणार!

### उपशहर प्रमुख पदी नियुक्ती झाल्यानंतर आदेश भगत यांचे वक्तव्य

### रमाकांत मढवी हे व्हिजन असणारे नेते!

## दिव्यातील आठही नगरसेवकांनी चांगले काम केल्याने मागील पाच वर्षात दिवा शहराचा विकास होताना पहायला मिळतोय!

### बाळासाहेबांची शिवसेना पक्षावर टीका करणाऱ्या विरोधकांना जशास तसे उत्तर देणार!

**दिवा न्यूज विशेष /एस.के.**

*मागील वर्षभरापूर्वी भाजप मधून शिवसेनेत प्रवेश केलेले ॲड.आदेश भगत यांच्यावर खासदार श्रीकांत शिंदे यांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या दिवा उपशहर प्रमुख पदाची जबाबदारी सोपवली आहे. नुकतेच त्यांना याबाबतचे नियुक्तीपत्र देण्यात आले. या नियुक्तीनंतर ॲड.आदेश भगत यांच्याशी दिवा न्यूजने विशेष संवाद साधला ...*

**प्रश्नः– पक्ष संघटनेत प्रवेश केल्यापासून तुम्ही शिवसेनेत सक्रिय होतात..तुम्हाला साधारण वर्षभरानंतर जबाबदारी दिली जात आहे,या नव्या जबाबदारी बद्दल काय सांगाल ?**

**आदेश भगतः–** पक्षांमध्ये प्रवेश करताना कोणती जबाबदारी मिळेल की नाही मिळणार हा विचार करून प्रवेश केला नव्हता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब आणि खासदार श्रीकांत शिंदे हे जेव्हा शब्द देतात तेव्हा तो नक्की पाळतात त्यामुळे संघटनात्मक बांधणी करण्याची जबाबदारी जी पक्षाने माझ्यावर सोपवली आहे ती पूर्ण विश्वासाने पार पाडण्याचा माझा प्रामाणिक प्रश्न असेल. या आधीही दिव्यात मी एका पक्षाचं नेतृत्व केलेले असल्याने त्या अनुभवाचा फायदा नक्कीच मला या ठिकाणी होईल.एक गोष्ट तुम्हाला सांगतो बाळासाहेबांची शिवसेना पक्षावर टीका करणाऱ्या विरोधकांना येणाऱ्या काळात जशास तसे उत्तर आम्ही देणार आहोत!

**प्रश्नः–दिवा रेल्वे प्रवासी संघटनेच्या माध्यमातून तुम्ही सामाजिक कामाला सुरुवात केली. एकीकडे सर्वसमावेशक रेल्वे संघटना आणि दुसरीकडे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे उपशहर प्रमुख पद या दोन्ही जबाबदाऱ्यांकडे कसे पाहता ?**

**आदेश भगतः–**मुळात रेल्वे प्रवासी संघटनेच्या माध्यमातूनच माझ्या समाजकारणाची आणि राजकारणाची सुरुवात झाली. त्यामुळे संघटना हा माझा सामाजिक आणि राजकारणाचा बेस आहे.रेल्वे प्रवाशांच्या प्रश्नाकडे माझं दुर्लक्ष होणार नाही, मी स्वतः एक रेल्वे प्रवासी असल्याने रेल्वे समस्या या कायमच मांडत राहील व ते प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करत राहील.राहिला प्रश्न संघटनात्मक जबाबदारीचा तर ही जी नवीन जबाबदारी आहे ती यशस्वीरित्या पार पाडण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील. संघटनात्मक काम करण्यावर माझा भर असेल.मागील वर्षभर शिवसेना पक्षात मी काम करतोय त्यामुळे इथे सहकार्य करणारे सर्व स्थानिक नेते आहेत. सर्वांच्या सोबतीने दिवा शहराच्या विकासासाठी जे करता येईल ते आपण करणार आहोत.

**प्रश्नः– दिवा शहरात समस्या खूप आहेत ...**

**आदेश भगतः–** खर आहे... मात्र, रमाकांत मढवी यांच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात विक्रमी काँक्रीटचे रस्ते दिवा शहरात झाले आहेत. कोणत्याही ठाणे महानगरपालिकेच्या प्रभागातील रस्त्यांपेक्षा इथं रस्त्यांची झालेली काम ही विक्रमी आहेत. मढवी हे व्हिजनरी नेता आहेत. त्यांच्याकडे व्हिजन आहे. त्यामुळे नक्कीच मागच्या पाच वर्षांमध्ये जी काम चांगल्या दर्जाची या ठिकाणी झाली आहेत ते जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न राहील. अनेक प्रश्न आजही सुटलेले नाही ही वस्तुस्थिती आहे आणि ते सोडवण्यासाठीचा प्रयत्न एक राजकीय चळवळीतील नेता म्हणून माझे प्रयत्न असतील... पण मागील पाच वर्षात दिवा ज्या झपाट्याने बदलतोय ते तुम्ही नाकारू शकणार नाहीत. दिव्यासाठी मागील पाच वर्षात जो विकास निधी खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या माध्यमातून मिळाला आहे,तो पाहता येणाऱ्या काळामध्ये दिवा शहराकडे त्यांचे विशेष लक्ष असणार आहे. दिव्याचे प्रश्न हे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या माध्यमातूनच सोडवले जाऊ शकतात हा विश्वास मला आहे.

**प्रश्नः– शिवसेनेचे दोन गट पडल्यामुळे येणाऱ्या काळात दिव्यातील शिवसैनिक कोणत्या बाजूने असतील? दिव्यात होत असलेल्या विकास कामांबद्दल तुमचं मत काय?**

**आदेश भगतः–** दिव्यातील शिवसैनिक हे बाळासाहेबांच्या शिवसेने सोबत आहेत... एकनाथ शिंदे साहेबांसोबत आहेत... शिवसेनेत मागील वर्षभर काम करत असताना अतिशय चांगला अनुभव आला.आता जबाबदारी मिळाली आहे.संघटनेची कामाची पद्धत खूप चांगली आहे,शिस्तबद्ध आहे. सगळेजण सहकार्य करतात. आणि इतर सर्व आठही नगरसेवकांनी चांगली काम केली असल्याने दिव्याचा झपाट्याने विकास होताना आपल्याला पाहायला मिळतोय. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्याचा विकास होतोय. अनेक प्रश्न आपण सोडवतोय. पाण्याच्या लाईन नवीन टाकतोय.येणाऱ्या काळात पाणी प्रश्न जवळपास सुटलेला असेल. त्यासाठीची पायाभरणी सुरू आहे.विकासकामे सुरू आहेत.बाळासाहेबांची शिवसेना हा पक्ष दिव्यात मजबूत आहे. बाळासाहेबांना मानणारा मोठा वर्ग दिव्यामध्ये आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व दिव्याने स्वीकारलेले आहे. येणाऱ्या काळात बाळासाहेबांची शिवसेना पक्षाची ध्येयधोरण सर्वसामान्य जनतेपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न मी करणार आहे.






**दिवा शहराचे लोकनेते शैलेश मनोहर पाटील यांनी माघी गणेशोत्सवानिमित्त दिवा शहरातील विविध ठिकाणच्या घरगुती गणेशाचे आपल्या सहकाऱ्यांसोबत जाऊन दर्शन घेतले,त्यावेळचे छायाचित्र.**



# ठाणे महानगरपालिकेत राष्ट्रीय मतदार दिन साजरा

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे बुधवारी १३ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यावेळी देशाच्या लोकशाही परंपरेच जतन करुन निपक्ष:पातीपणे व कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करणेबाबतची शपथ महापालिका अधिकारी कर्मचारी यांना देण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त मारुती खोडके, प्रशांत रोडे, निवडणूक सहाय्यक आयुक्त समीर जाधव, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपकार्यालयीन अधीक्षक जयानंद नायकोडी यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

२५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. आयोगाचा हा स्थापना दिवस संपूर्ण देशभरात राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतदारांना, विशेषत: नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, सुलभरित्या त्यांची नावनोंदणी करुन घेणे, देशातील मतदारांना समर्पित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढावा म्हणून त्यांना जागरुक करण्यासाठी केला जातो. यावेळी 'मै भारत हु' हे गीत प्रसारित करण्यात आले.



# धर्मवीर स्व. आनंद दिघे यांना मुख्यमंत्री शिंदे यांची आदरांजली

**ठाणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मृती स्थळी तसेच आनंद आश्रम येथे जाऊन स्व. दिघे यांना आदरांजली वाहिली. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आनंद आश्रमात जाऊन स्व. दिघे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर शक्तीस्थळावर जाऊन समाधीवर पुष्प अर्पण केले.



# किसननगर वासीयांनो पिण्याच्या पाण्याचा वापर गाळून व उकळून करावा

## ठामपाचे आवाहन

**ठाणे :** बृहन्मुंबई महापालिकेच्या भुमिगत जलबोगद्याच्या दुरुस्तीचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू असल्याने पुर्ण होईपर्यंत ठाणे महापालिका क्षेत्रातील किसननगर नं १,२ व भटवाडी परिसरात मुंबई महापालिकेमार्फत होणारा पाणी पुरवठा जल शुध्दीकरणाची प्रक्रिया न केलेल्या स्वरुपाचा होईल. तरी नागरिकांनी पिण्याचा पाण्याचा वापर गाळून व उकळून करावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात काही विभागात बृहन्मुंबईकडून पाणीपुरवठा होतो. भांडुप येथे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्यामुळे सदरचे काम हे मोठ्या प्रमाणात असल्यामुळे पुढील काही दिवस प्रक्रिया न केलेल्या पाण्याचा पुरवठा होणार आहे. तरी ठाण्यातील किसननगर १, २ व भटवाडी विभागातील नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने दक्षतेचा उपाय म्हणुन पिण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी गाळून व उकळून घेण्यात यावे महापालिकेच्यावतीने कळविण्यात येत आहे. तरी नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणीपुरवठा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# रिक्षाचालक आणि प्रवाश्यांमध्ये आता हायटेक सुसंवाद

## मोटोफिट्सच्या टॅबचे आ. संजय केळकर यांच्याकडून लोकार्पण..



### प्रवाश्यांच्या सुरक्षेसाठी 'पॅनिक' बटण

रिक्षात बसवलेल्या या टॅबमध्ये प्रवाश्यांच्या सुरक्षेसाठी 'पॅनिक' बटण दिले असुन रिक्षाचालकांचे गैरवर्तन आढळल्यास टॅबला जोडलेले पॅनिक बटण प्रवाशाने दाबल्यास तात्काळ अलर्ट मोटोफिटसच्या सेंटरला पोहचणार आहे. टॅब व पॅनिक बटणमध्ये असलेल्या जीपीएसद्वारे अचुक वेळ, रिक्षाचा नंबर, रिक्षाचे लोकेशन आदी माहिती या संदेशातुन मिळाल्यानंतर तात्काळ नजीकच्या पोलीस स्थानकाला तसेच प्रवाश्यांना वैद्यकिय मदत पुरवता येणार असल्याचा दावा सचिन पोतदार यांनी केला आहे.

**ठाणे:** रिक्षाचालक आणि प्रवाश्यांमध्ये मोटोफिटसचे 'ऑटो सारथी' हे हायटेक तंत्र सुसंवाद घडवणार आहे.असा विश्वास आ. संजय केळकर यांनी व्यक्त केला आहे. प्रवाशांना विविध सुविधांसोबतच सुरक्षिततेची हमी देणारे मोटोफिट्स प असलेल्या टॅबचे रिक्षाचालकांना लोकार्पण बुधवारी आ. केळकर यांच्याहस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी, मराठी अभिनेता दिगंबर नाईक, ठामपा परिवहन सदस्य विकास पाटील, मोटोफिटसचे सीईओ सचिन पोतदार, नितीन पोतदार तसेच, अबोली रिक्षाचालक अनामिका भालेराव आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आ.केळकर यांनी,रिक्षात बसवलेले हे टॅब रिक्षाचालकांना चांगला मोबदलाही देणार असुन यामुळे रिक्षाचालकांची प्रतिमा सुधारण्यास हातभार लागणार असल्याचे सांगितले.

रिक्षाचालकांची मुजोरी तसेच प्रवाश्यांसोबत भाड्यावरून होणारे किरकोळ वाद ही नित्याचीच बाब बनली आहे. त्याचबरोबर, रिक्षा व्यवसायात काही गुन्हेगारी वृत्तीची मंडळी आल्याने महिला प्रवाशांशी गैरवर्तनाच्या घटना वाढीस लागल्या आहेत. त्यामुळे रिक्षाचालकांबाबत असलेली नाराजी आणि उभयतांमधील संबंध सुधारणारे प ऑटोमोटोस या कंपनीने तयार केले आहे.हे प असलेले टॅब रिक्षाचालकांना मोफत देण्यात आले असुन हे टॅब रिक्षाचालकांना चांगले उत्पन्न देणारे ठरत आहेत. या टॅबमध्ये व्यावसायिक जाहिराती प्रदर्शित करण्यात येणार असल्याने मिळणाऱ्या उत्पन्नातून रिक्षाचालकांना मासिक दोन हजार रुपये मोबदला आणि दोन लाखांचा विमा देण्यात येत आहे. एखादेवेळी प्रवाशांची तब्येत अचानक ढासळल्यास त्याला जवळच्या रुग्णालयात नेल्यास तसेच शिवाय उत्तम प्रवासी सेवा देणाऱ्या रिक्षाचालकास प्रवाशांकडून रेटिंग देण्याची सुविधा टॅबमध्ये आहे. त्याचाही अतिरिक्त आर्थिक लाभ रिक्षाचालकांना मिळणार आहे.

या टॅबमध्ये जाहिरातींबरोबरच विविध सेवा भरतीच्या अर्जाचे नमुने उपलब्ध होणार आहेत. प्रवाशांसाठी प्रथमोपचार पेटीही रिक्षा चालकांना देण्यात येणार आहे.विविध सामाजिक संस्था, संघटना, कार्यकर्ते आदी घटकांना त्यांच्या कार्याची आणि उपक्रमांची प्रसिद्धीदेखील या टॅबद्वारे करता येणार असल्याचे सीईओ सचिन पोतदार यांनी सांगितले.



# माघी गणेश जयंती निमित्त कृष्णा पाटील यांनी घेतले प्रभागातील विविध ठिकाणच्या गणरायाचे दर्शन!

नगरसेवक कृष्णा पाटील यांनी माघी गणेश उत्सव जयंती निमित्त प्रभागातील विविध ठिकाणी स्थापित झालेल्या गणेश मूर्तींचे कार्यकर्त्यांसह जाऊन दर्शन घेतले व बाप्पाचे आशीर्वाद घेतले त्या वेळची छायाचित्रे.









# ठाण्यात लवकरच सभा घेणार म्हणजे घेणारच



# मशाल पेटवल्याशिवाय नाही राहणार

**ठाणे: लवकरात लवकर ठाण्यामध्ये एक प्रचंड आपली जाहीर सभा घेणार म्हणजे घेणारच आहे. असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले. तसेच त्यावेळेला मग कोणाचं काय समाचार घ्यायचा तो मी घेईन. असे म्हणत, या ठिकाणी अस्सल निष्ठावंत येथे आहेत. बाकी विकले गेलेले आहेत, जे कितीला विकले गेले आहेत हे तुम्हाला माहितीच आहे. असे ते म्हणाले. पण त्याच ५० खोक्यांची घोषणा कश्मीरपर्यंत गेल्याची टीका उध्दव ठाकरे यांनी शिंदे गटावर ठाण्यात केली. मात्र त्या घोषणामुळे महाराष्ट्राची बदनामी झालीच. त्याचबरोबर शिवसेनेची बदनामी झाली अशी खंतही त्यांनी यावेळी बोलून दाखवली. गेलेल्या त्यांचे दुःख बाळगण्याचे कारण नाही, जे राहिले ते निखारे आहेत ते भविष्यात मशाल पेटविल्याशिवाय राहणार नाहीत असे म्हणून उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांच्या मनात ऊर्जास्त्रोत भरण्याचे काम केले.**

जांभळीनाका येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात ठाणे जिल्हा प्रमुख दिवंगत आनंद दिघे यांच्या जयंतीनिमित्तशिवसेना ठाकरे गटा तर्फे मोफत महाआरोग्य शिबीराचे आयोजन केले होते. याचे उद्घाटन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले.एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत उभी फूट पडली आहे. ठाणे हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. परंतु शिवसेनेत फूट पडल्यानंतर ठाण्यातील बहुतांश नगरसेवकांनी एकनाथ शिंदे यांना समर्थन जाहीर केले आहे. त्यामुळे पक्षाला सर्वाधिक फटका ठाण्यात बसला आहे. राज्यातील सत्तांतरानंतर उद्धव ठाकरे प्रथम ठाण्यात आले. आनंद नगर जकात नाक्यावर मोठया संख्येने शिवसैनिकांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी बाईक रॅली काढण्यात आली. तर महा आरोग्य शिबिरात त्यांचे शिवसैनिक उभे राहून स्वागत केले. त्यावेळेस ठाकरे उद्धव ठाकरे म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी जागतिक संकट आले होते. तेव्हा सर्व धर्मियांनी सहकार्य केले. मंदिर बंद होते,तेव्हा डॉक्टर, पोलीस, नर्स यांसारखे सर्व देव म्हणून आले होते. राजकारणाच्या घाणीत न जाता तुम्ही निष्ठेने काम करता. याला शिवसैनिक म्हणतात. असेही ते शिवसैनिकांना उद्देशून म्हणाले.

आरोग्य शिबिराच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांच्यासोबत राष्ट्रवादीचे आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड हे दाखल झाले होते. त्यानंतर दिवसभर उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्यात आव्हाड त्यांच्या सोबतीने होते. आव्हाड यांच्या उपस्थितीमुळे राजकीय नेतेमंडळींच्या भुवया उंचावलेला आहेत. तसेच अशाप्रकारे आव्हाड यांच्या जाहीर उपस्थितीमुळे ठाणे महापालिका निवडणुकीत ठाकरे गट आणि राष्ट्रवादीची राजकीय समिकरणे जुळण्याची चर्चा सुरू झाली आहे.

उद्धव ठाकरे यांना जैन धर्मगुरूंनी आशीर्वाद देत, आम्ही तुमच्या सोबत असल्याचे सांगितले. तसेच आपल्यासाठी आम्ही रक्त ही देण्यासाठी तयार आहोत. यावेळी उध्दव ठाकरे यांनी प्रजासत्ताकासाठी रक्त देऊ नका फक्त मत दया असे म्हणत, तुम्हचा आशीर्वाद महत्त्वाचा आहे. तोच घेण्यासाठी आलो आहे. तुम्ही अतिथी म्हटले. हे मला मान्य नाही. मी अतिथी नाही. मी आपल्या घरातील व्यक्ती आहे. आपल्या ठाण्यात आलो आहे आणि आपल्या जैन परिवारमध्ये आलो. असेही ते म्हटले. बाळासाहेब ही येथे आले होते. त्यामुळे आपले नाते जुने आहे. असे म्हणून मी पुन्हा येईल असे आवर्जून सांगितले.

✻ उद्धवांना पाहण्यास गर्दी ; शिवसैनिकांमध्ये तोच उत्साह

शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात ही मोठी फूट पडली. त्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ठाण्यात येणार म्हटल्यावर गर्दीबाबत साशंकता होती. मात्र ती साशंकता खोटी ठरवून शिवसैनिकांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रम असताना मोठ्या संख्येने गर्दी केले. यावेळी शिवसैनिकांमध्ये तोच उत्साह पाहण्यास मिळाला. आरोग्य शिबीरात उद्धव ठाकरे दाखल होताच, शिवसैनिकांनी उभे राहून आल्या नेत्याचे स्वागत केले.

# आनंदमठावर कब्जा करणाऱ्या शिंदे गटाला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांच्याकडून कौरवांची उपमा

## दुसऱ्याचे राज्य बळकवणाऱ्या कौरवांचा महाभारतात पराभव झाल्याचा दाखला!

**ठाणे:** शिंदे गटाने टेंभी नाका येथील आनंद आश्रमावर कब्जा केल्यानंतर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी शिंदे गटाला दुसऱ्याचे राज्य बळकावणाऱ्या कौरवांची उपमा दिली आहे. महाभारतात पांडवांचे सर्वकाही बळकाऊ पाहणाऱ्या कौरवांचा पराभव झाला होता,असा टोला घाडीगावकर यांनी ट्विटच्या माध्यमातून लगावला आहे.

शिंदे गटाने शिवसैनिकांचे दैवत असणाऱ्या आनंद दिघे यांचे निवासस्थान असणाऱ्या आनंद आश्रम वर कब्जा केल्या नंतर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी ट्विटरच्या माध्यमातून शिंदे गटावर हल्लाबोल केला आहे. कौरवांची प्रवृत्ती ही दुसऱ्याच राज्य बळकवायची होती.त्यांनी पांडवांचे राज्य बळकावले पण नंतर त्यांचा पराभव होऊन सत्याचा विजय झाला. दिघे साहेबांचे निवासस्थान हे सर्वसामान्य ठाणेकर जनतेचे आशास्थान आहे. दिघेसाहेबांच्या आनंदाश्रम मध्ये जाऊन आजही सर्वसामान्य ठाणेकर तिथे नतमस्तक होतो. अशा आनंद मठाला पक्ष कार्यालय करणे यातून शिंदे गटाची मानसिकता लक्षात येते. असेही घाडीगांवकर यांनी म्हटले आहे .आज आधुनिक काळातही कौरवी वृत्ती अस्तित्वात आहे. आधी पक्ष बळकवण्याचा प्रयत्न झाला,बाळासाहेबांना चोरण्याचा प्रयत्न झाला. मग चिन्ह आणि आता ठाणेकरांचे दैवत असणाऱ्या आनंद दिघे साहेबांचा आनंद मठ बळकावला. लक्षात ठेवा महाभारतात कौरवांचा पराभव झाला होता अशा आशयाचे ट्विट संजय घाडीगावकर यांनी केले असून या ट्टीटच्या माध्यमातून त्यांनी शिंदे गटावर निशाणा साधला आहे.